पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 08/03/2020 (रविवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर मौजा आजनगाव रोड शिवार येथे दिनांक 06/03/2020 चे 19.00 वा. दरम्यान बोरी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बोरी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 27/ एक्स – 6361 क्रमांकाच्या नेनो पिकअप गाडीला थांबविले. या गाडी मध्ये एकुण 04 (गोरे) कि. 32,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी घटनास्थळावरून वाहन सोडून पसार झाले. वाहनासह एकुण किंमती 3,07,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. मयुर ढेकले, पो.स्टे. बोरी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 11 (ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(1)(2)9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. मयुर ढेकले 9764231048 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर